लोंढरी ता जामनेर जिल्हा जळगाव येथे
जागा भाड्याने पाहिजे
१०० ते १२० एकर जमीन
३० वर्षांच्या लिज वर हवी आहे.
भाडे आणि भाडेवाढ शासकीय नियमा प्रमाणे असेल.
मार्कोनी इंडिया सोलर इफोटेक सिस्टम
संपर्क 9890520800,9881020800

शिल्पकार विकासाचा...
# देशदूत

Ultimate move to success Join
Choubey's Academy
Admission Open
CBSE & STATE BOARD 11th Sci. & 12th Sci.
Physics & Maths + Electronics
8th 9th 10th Maths & Science
JEE/MHCET/NEET Separate Batches
FOUNDATION COURSES
100% Result Individual Attention 43 Years Experience Reasonable Fees
Ardessar Building, Garud Plot, Bhusawal
Prof. R.M. Choubey, Mob. 9422778497

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक १९७ । शनिवार, दि. १२ जुलै २०२५ । पाने -१० | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## संपादकीय

### प्रवेशप्रक्रियेची वैतागवाडी

अकरावी प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांच्या मागे लागलेले अडचणींचे शुक्लकाष्ठ अजून संपायला तयार नाही. सुरुवातीला प्रवेश प्रक्रिया खंडित झाली होती. आता प्रवेशासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक दाखले देण्याचे काम ठप्प झाले आहे. एकदम वापर वाढल्याने ताण येऊन सर्व्हर मध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचे कारण दोन्ही वेळेला सांगितले गेले. ते कारण खरेही असेल. पण तसे झाले तर निदान दाखले वाटप सुरु ठेवण्याचे अन्य पर्यायही तयार नाहीत. परिणामी दाखल्यांसाठीच्या रांगा वाढत आहेत. ही अवस्था वादावादीला पोषकच नाही का? दरवर्षी तेच ते आणि तेच ते कसे घडते? गेल्या दोन तीन वर्षांपासून अकरावी प्रवेश प्रक्रिया सप्टेंबरपर्यंत रेंगाळल्याचे आढळते. वैतागलेले पालक आणि गोंधळलेले विद्यार्थी हे नेहमीचे चित्र झाले आहे. ते पाहाता विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना प्रवेशाची जुनीच पद्धत योग्य वाटायाला लागली असेल तर नवल नाही. प्रवेश घेणाऱ्या आणि आरक्षणास पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे दाखले जमा करणे अपरिहार्य असते. त्यातील एक जरी कागद कमी असला तरी त्याचे दूरगामी परिणाम विद्यार्थ्यांच्या भविष्यावर होऊ शकतात. किती विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात याचा अंदाज असतो. ऑनलाईन प्रक्रिया सुरु झाल्यावर हजारो विद्यार्थी एकदमच त्याचा लाभ घेणार हे वेगळे सांगायला नको. ही सगळी किचकट परिस्थिती हाताळण्याची क्षमता असलेल्या संस्थेकडे काम सोपवणे ही यंत्रणेची जबाबदारी आहे. ती पार पाडण्यात यंत्रणा अनुत्तीर्ण झाली आहे आणि त्याचा ताण मात्र विद्यार्थी आणि पालकांना सहन करावा लागत आहे. अकरावीत प्रवेश हे दोन शब्द वाचण्याइतके विद्यार्थ्यांसाठी हे काम सोपे नसते. मनपसंत महाविद्यालय हवे असते. दाखले जोडले गेले नाही तर आरक्षणाचा लाभ मिळेल की नाही याचा अंदाज नसतो. ठराविक वेळ गेली तर अर्ज पुन्हा भरावा लागतो. अनेक विद्यार्थी खासगी सायबर कॅफेत जाऊन ही प्रक्रिया पूर्ण करतात. प्रक्रिया रेंगाळली तर त्याचा आर्थिक भुर्दंड बसतो तो वेगळाच. अन्याय झाला म्हणून एखादा विद्यार्थी न्यायलयात जाण्याची शक्यता नाकारली जाऊ शकेल का? अडनिड्या वयाच्या मुलांनी किती ताण सहन करायचा याला मर्यादा आहेत

पान २ वर »

# हे भाजपा सुरक्षा विधेयक!

## माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंचा फडणवीसांवर निशाणा

**मुंबई ।** जनसुरक्षा विधेयकाला आमचा विरोध असल्याचे मत शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केले. राजकीय हेतूने विधेयक आणू नका असे ठाकरे म्हणाले. या विधेयकात नक्षलवाद असा कुठेही उल्लेख नाही. त्यामुळे या विधेयकाचे भाजप सुरक्षा विधेयक ठेवा असा टोला उद्धव ठाकरे यांनी केला. मिसा, टाडा या प्रमाणेच हे विधेयक असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले.

या विधेयकामध्ये राजकीय दुरुपयोगाचा वास येत असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. नक्षलवाद संपत आलाय, मग कायदा कोणासाठी? असा सवालही उद्धव ठाकरेंनी यावेळी केला. शेंडा बुडका नसलेलं हे विधेयक असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. बेकायदा कृत्य याची स्पष्ट व्याख्या विधेयकामध्ये नाही. विरोधकांना त्रास देण्यासाठी कायदा आणत आहात का? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला. या विधेयकाचे नाव जनसुरक्षा विधेयक असे असले तरी हे विधेयक भाजपच्या सुरक्षेसाठी आणल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले.



देशविघातक शक्तीचा बिमोड करा

जनसुरक्षा कायदा आणला जात आहे. बहुमताच्या जोरावर हा कायदा आणला जात आहे. सांगताना सरकार सांगत आहे की नक्षलवादाचा बिमोड करायचा आहे. पण कायद्यात नक्षलवाद असा उल्लेख नाही. विधेयकात कडव्या डाव्या विचारसरणी असा उल्लेख आहे. देशविघातक शक्तीचा बिमोड करण्यासाठी आम्ही सरकारसोबत असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. पण तुम्ही राजकीय हेतून विधेयक आणत आहात. यामध्ये राजकीय दुरुपयोगाचा वास येत असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. कुणालाही कधीही ताब्यात घेतले जाऊ शकतं असे उद्धव ठाकरे म्हणाले. या बिलामध्ये नक्षलवादाचा उल्लेख येणं गरजेचे असल्याचे ठाकरे म्हणाले. या कायद्याचा राजकीय दुरुपयोग केला जाईल असे ठाकरे म्हणाले.

### शेंडा बुडका नसलेले जनसुरक्षा विधेयक

जो कोणी भाजपविरोधात बोलेल तो देशद्रोही आहे असे त्यांना वाटत असेल तर ते विकृत मानसिकतेचे असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. रस्त्यावर कोणी उतरु नये म्हणू हा कायदा आणल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. हे विधेयक शेंडा बुडका नसलेले आहे. जनसुरक्षेच्या नावाखाली तुम्ही उद्या कोणालाही आत टाकाल असे उद्धव ठाकरे म्हणाले. कडवे डावे म्हणजे काय? असा सवाल देखील यावेळी उद्धव ठाकरेंनी केला.

# नुकसानीचा एक फोटो दाखवा!

## अजित डोवाल यांचे परदेशी माध्यमांना आव्हान

**मुंबई ।** पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर राबवले. या ऑपरेशनमध्ये भारताच्या सामर्थ्याचे संपूर्ण जगाला दर्शन झाले. या ऑपरेशनच्या अंमलबजावणीतील महत्त्वाची व्यक्ती म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल. डोवाल यांनी शुक्रवारी ऑपरेशन सिंदूरबाबत सविस्तर माहिती दिली. डोवाल यांनी यावेळी ऑपरेशन सिंदूरच्या वृत्तांकनावरून परदेशी माध्यमांना फटकारले. पाकिस्तानी हल्ल्यांमुळे भारतीय पायाभूत सुविधांचे नुकसान झाल्याचे पुरावे देण्याचे आव्हान त्यांनी माध्यमांना दिले.



आयआयटी मद्रासच्या ६२ व्या दीक्षांत समारंभात बोलताना अजित डोवाल यांनी ऑपरेशन सिंदूरबद्दल सांगितले. त्यांनी यावेळी परदेशी माध्यमांचा पूर्वग्रहदूषितपणा अधोरेखित केला. ते म्हणाले की, परदेशी माध्यमांनी पाकिस्तानने असे केले आणि तसे केले असे वृत्त दिले, परंतु याबाबत प्रसिद्ध झालेल्या फोटोंमध्ये केवळ भारतीय हवाई दलाने पाकिस्तानच्या तळांवर केलेल्या नुकसानीचेच दर्शन होते.

परदेशी माध्यमांनी म्हटले की, पाकिस्तानने ते केले आणि हे केले. मला एक तरी फोटो दाखवा, ज्यात कोणत्याही भारतीय संरचनेचे नुकसान झाल्याचे, अगदी काचेचा एक तुकडाही तुटल्याचे दिसते, असे आव्हान डोवाल यांनी दिले.

मी तुम्हाला फक्त परदेशी माध्यमांनी प्रतिमांच्या आधारे जे काही प्रसिद्ध केले ते सांगत आहे. आम्ही नुकसान करण्यास सक्षम आहोत, असेही डोवाल यांनी सांगितले. ९ आणि १० मे च्या मध्यरात्री, भारतीय हवाई दलाने इतर दलांच्या सक्रिय मदतीने देशाच्या कानाकोपऱ्यातील पाकिस्तानी हवाई तळांवर हल्ले केले आणि या प्रक्रियेत पाकिस्तानच्या चीनी हवाई संरक्षण प्रणालींनाही निकामी केले.

# शनिशिंगणापूर मंदिर विश्वस्त मंडळ बरखास्त

**मुंबई ।** कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी शनि शिंगणापूर येथील शनेश्वर देवस्थानचे विश्वस्त मंडळ बरखास्त करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत केली. जे कर्मचारी अथवा विश्वस्त लोकसेवकच्या संज्ञेमध्ये येत असतील त्या सगळ्यांच्या अपसंपदेची चौकशी केली करून त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल केले जातील, असेही फडणवीस यांनी सांगितले.

भाजपचे आमदार विठ्ठल लंघे यांनी आज विधानसभेत शनि मंदिरातील घोटाळ्यांबद्दलची लक्षवेधी सूचना मांडली होती. या सुचनेवरील चर्चेला उत्तर देताना फडणवीस यांनी शनि शिंगणापूर देवस्थानात तब्बल २ हजार ४७४ बोगस कर्मचारी दाखवून देवस्थानचे पैसे पगाराच्या स्वरूपात आपल्याच कार्यकर्त्यांच्या खात्यात वळते केल्याचे सांगत देवस्थानच्या गैरकारभाराचा सारा हिशोबच विधानसभेत उघड केला. देवाच्या नावावर भ्रष्टाचार करणाऱ्यांना त्यांची जागा दाखविली जाईल, असा निर्धारही त्यांनी बोलून दाखवला.

# पैशांनी भरलेली बॅग; अडचणीत शिरसाट

## ठाकरेंच्या संजयचा शिंदेंच्या संजयवर प्रहार

**मुंबई ।** महायुतीचे मंत्री संजय शिरसाट यांना आयकर विभागाची नोटीस आली आहे. यानंतर आता संजय शिरसाट यांचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी हा व्हिडीओ दाखवला आहे. या व्हिडीओत संजय शिरसाट यांच्याकडे असलेल्या बॅगेत नोटांचे बंडल पाहायला मिळत आहे. त्यामुळे आता चर्चांना उधाण आले आहे.त्यामुळे एका संजयने दुसऱ्या संजयला अडचणीत आणले आहे.

व्हिडीओत नेमके काय?

या व्हिडीओत संजय शिरसाट हे आपल्या बेडरूममध्ये बसलेले आहेत. त्यांच्या बाजूला एका बॅगेत नोटांचे बंडल स्पष्टपणे दिसत आहेत. या व्हिडीओत संजय शिरसाट हे सिगारेट पिताना आणि फोनवर बोलतानाही दिसत आहेत. त्यासोबतच या व्हिडीओत त्यांचा पाळीव कुत्राही फिरताना दिसत आहे. सध्या संजय शिरसाट यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.



संजय राऊत यांनी केले उघड

खासदार संजय राऊत यांनी या व्हिडीओवरुन शिंदे गटावर टीका केली आहे. आयकर विभागाची नोटीस आलेल्या मंत्र्याचा व्हिडीओ माझ्याकडे आहे, असा खळबळजनक दावा संजय राऊत यांनी केला होता. माझ्याकडे असलेल्या व्हिडीओत संबंधित मंत्री पैशांच्या बॅगा घेऊन बसलेत हे दिसत आहे, असेही संजय राऊतांनी म्हटले होते. या व्हिडीओमुळे आता राजकारणात खळबळ उडाली आहे. तसेच यामुळे शिरसाट यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान हा व्हिडीओ समोर येताच संजय शिरसाट यांच्याबाबत वेगवेगळे तर्क लढवले जात आहेत. पैशांनी भरलेली बॅग नेमकी कुठून आली? संजय शिरसाट यांच्याकडे पैसे कुठून आले? असा सवालही केला जात आहे. यावरच आता समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. ती बॅक पैशांनी भरलेली नाही. तिच्यात कपडे आहेत, असा दावा शिरसाट यांनी केला आहे.

# सार्वजनिक ठिकाणी मद्यपानाला प्रतिबंध!

**मुंबई ।** उद्याने, मैदाने यासारख्या सार्वजनिक ठिकाणी होणारे मद्यपानाचे प्रकार रोखण्यासाठी आमदारांची समिती नेमली जाईल. या समितीची मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात येईल. बैठकीतील चर्चेच्या सारांशानुसार सहा महिन्यात सार्वजनिक ठिकाणी मद्यपानाला मनाई करणारा कायदा केला जाईल, असे आश्वासन मंत्री आशिष शेलार यांनी शुक्रवारी विधानसभेत दिले.

भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आज विधानसभेत महाराष्ट्र दारूबंदी सुधारणा अशासकीय विधेयक सादर केले. या विधेयकाच्या माध्यमातून मुनगंटीवार यांनी सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन होणारे गैरवर्तन टाळण्यासाठी अशा जागी दारू पिण्यास प्रतिबंध करणारा कडक कायदा करावा, अशी मागणी केली. या मागणीवर शेलार यांनी सरकारच्यावतीने सकारात्मक प्रतिसाद दिल्यानंतर मुनगंटीवार यांनी विधेयक मागे घेतले.

# शिक्षकांना १ तारखेलाच पगार!

**मुंबई ।** राज्यातील शिक्षकांना यापुढे महिन्याच्या एक तारखेला किंवा महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये पगार देण्याबाबत प्रशासनाला सूचना देण्यात येतील, असे आश्वासन शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी शुक्रवारी विधान परिषदेत दिले.

राज्यातील शिक्षकांचा पगार विलंबाने होत असल्याबद्दल आमदार किरण सरनाईक यांनी प्रश्न विचारला होता. शिक्षकाच्या वेतनासाठी पुरेशा निधीची तरतूद करावी, अशी मागणी करत इतर लेखाशीर्षामधून शिक्षकांचे पगार उशीरा होत असतात, याकडे सरनाईक यांनी सरकारचे लक्ष वेधले. वार्षिक अंदाजपत्रकात निधीची तरतूद होऊनही पगाराला होत असलेल्या विलंबाबाबत त्यांनी शिक्षकांची कैफियत मांडली. तर वेतन उशिराने मिळत असल्याने शिक्षकांच्या बँकेचे हप्ते थकतात. त्यामुळे त्यांना दंड होतो. हा भुर्दंड असून तो दंड सरकारने भरून द्यावा. तसेच शिक्षकांचा पगार हा महिन्याच्या शेवटच्या हप्त्यात देण्याची मागणी काँग्रेसच्या आमदार भाई जगताप यांनी केली.दरम्यान, आपल्या उत्तरात पंकज भोयर यांनी शिक्षकांचा पगार विलंबाने होत असल्याची कबुली दिली.

# अचानक कोसळल्याने विद्यार्थ्याचा मृत्यू

**जळगाव ।** शहरातील आर. आर.विद्यालयात खेळत असताना अचानक जमिनीवर पडल्याने नववीच्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना आज दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास घडली आहे. कल्पेश वाल्मीक इंगळे (वय १५ रा. कठोरा जि. बुलढाणा ह.मु. कासमवाडी) असे मयत झालेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, कल्पेश इंगळे हा विद्यार्थी आई वडील, बहीण आणि लहान भावासोबत वास्तव्याला होता. नेहमीप्रमाणे शुक्रवारी ११ जुलै रोजी सकाळी शाळेत आलेला होता. दुपारी ३ वाजता शाळेच्या मधल्या सुट्टीत जेवणासाठी सुट्टी झाली होती. विद्यार्थ्यांसोबत खेळत असतात तो अचानक जमिनीवर कोसळला अशी माहिती शाळेची शिक्षकांनी दिली आहे. दरम्यान त्याला शिक्षकांनी उचलून तातडीने जवळच असलेल्या एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यावेळी वैद्यकीय अधिकारी यांनी मयत घोषित केले. यावेळी कल्पेशच्या आई वडील आणि भाऊ यांनी एकच आक्रोश केला होता.

दरम्यान कल्पेश याच्या आई–वडिलांनी इतर विद्यार्थ्यांकडून त्याला मारहाण झाली सकाळी गेला तेव्हा तो चांगला होता दोन दिवसांपूर्वीसुद्धा त्याचा वाद झाला होता, त्यामुळे शाळेचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात यावे, चौकशी करावी व दोषींवर अटक करून कारवाई करावी त्यानंतरच मृतदेह ताब्यात घेणार असल्याची मृत कल्पेश याच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली आहे. कल्पेश याच्या पश्चात आई शीतल वडील एक भाऊ वेदांत आणि एक बहीण प्रगती असा परिवार आहे.

# चीनची बेकायदा आयात थांबवा !

### अजित पवार यांची केंद्राकडे मागणी

**मुंबई ।** चीनमधून कर चुकवून निकृष्ट बेदाण्यांची मोठ्या प्रमाणावर आयात होत असून यामुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे आणि राष्ट्रीय महसुलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. चीनमधून होणारी बेदाण्यांची बेकायदा आयात तात्काळ थांबवावी. बेदाण्यांचे दर स्थिर ठेवून द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

महाराष्ट्र राज्य द्राक्ष उत्पादक संघाने यासंदर्भात अजित पवार यांची भेट घेऊन त्यांचे या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधले होते. या पार्श्वभूमीवर पवार यांनी केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याणमंत्री शिवराजसिंह चौहान तसेच केंद्रीय व्यापारमंत्री पीयूष गोयल यांना पत्र लिहिले आहे. चीनमधून निकृष्ट दर्जाच्या बेदाण्यांची बेकायदा आयात वाढली आहे. आयात कर आणि शुल्क चुकवून बेदाणे मोठ्या प्रमाणावर भारतात आणले जात आहेत. या कर चोरीमुळे सरकारचा महसूल बुडत असून देशाच्या महसुलाचे नुकसान होत आहे. ऐन हंगामात होत असलेल्या बेकायदा आयातीमुळे देशातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या बेदाण्यांचे दर प्रतिकिलो १०० ते १२५ रुपयाने घसरले आहेत. याचा फटका द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे.

### केळी भाव

नवती (१) : 2475
नवती (२) : 2275

### मिश्कीली




# मनपा निवडणुकीसाठी ईव्हीएम सज्ज ठेवा!

## निवडणूक आयोगाचे महापालिकांच्या आयुक्तांसह विभागीय अधिकाऱ्यांना निर्देश

**मुंबई ।** राज्यातील महापालिकांच्या आगामी निवडणुकांसाठी आवश्यक ती सर्व प्रकारची पूर्वतयारी करून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) प्राथमिक तपासणी करून ती मतदानासाठी सज्ज करावीत, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी शुक्रवारी येथे दिले.

राज्यात लवकरच महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका होऊ घातल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकांच्या आगामी निवडणुकांच्या प्राथमिक तयारीसंदर्भात विभागीय आयुक्त आणि महानगरपालिका आयुक्तांची आज व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत बोलताना वाघमारे यांनी सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीबाबत आयुक्तांना सूचना केल्या.



राज्यातील सर्व २९ महापालिकांच्या निवडणुकांच्या तयारीबाबत आतापासूनच दक्ष राहण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे ऐनवेळी होणारी धावपळ टळू शकेल. मतदार संख्या, मतदार केंद्र, उपलब्ध इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि उपलब्ध मनुष्यबळ इत्यादींची आपल्या स्तरावरील उपलब्धता लक्षात घ्यावी. मतदान यंत्रांची प्राथमिक तपासणी झाल्यानंतर आवश्यक संख्येचा अंदाज घेता येईल. मनुष्यबळाबाबत विभागीय आयुक्तांनी समन्वयकाची भूमिका घेऊन सर्व महानगरपालिका आयुक्तांसोबत वेळोवेळी आढावा घ्यावा. सर्व संबंधितांशी समन्वय आणि नियोजनपूर्वक तयारी केल्यास आपल्याला या निवडणुका मुक्त, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडणे सहज शक्य होईल, असे वाघमारे म्हणाले.

तर मतदाराची संख्या लक्षात घेऊन मतदान केंद्रांची अचूक संख्या निश्चित करता येईल. त्या आधारे पुढील नियोजन करणे सुलभ होईल. मतदान केंद्राचा अचूक अंदाज आल्यावर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या आवश्यकतेबाबतही नियोजन करता येईल. मनुष्यबळाचाही अंदाज येईल. विभागीय आयुक्तांच्या समन्वयातून आजुबाजूच्या जिल्ह्यातील मनुष्यबळ उपलब्ध करून घेता येईल. एकूणच तयारीबाबतची सर्व तपशीलवार आणि अद्ययावत माहिती तयार ठेवावी. त्याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येईल, असे निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी यावेळी सांगितले.

पुण्यासह मुंबई व जळगांव येथील शाखेतही
उद्या जळगावात
पुण्याचे नाडीतज्ञ वैद्य प्रविण पाटील
M.D. (Ayurveda) आयुर्वेद वाचस्पती, पुणे
रविवार,दि.१३ जुलै २०२५ रोजी, डॉ. उभाड पाटील मुलांचे व डोळ्यांचे हॉस्पी. नुतन मराठा कॉलेज जवळ, जळगाव.
वेळ– स.९ ते ६
पाठीचे आजार,संधिवात/उपचार
* स्लिपडिस्क * लंबगो * मानदुखी * डिस्क प्रोब्लेम्स् * पाठदुखी
* हातापायाला मुंग्या येणे * कॉर्ड कॉम्प्रेशन * कंबरदुखी
* स्पॉन्डीलायटिस * पाय लुळा पडणे * स्पॉन्डीलिसिस सायटिका
* संधिवात * आमवात * चिकनगुणीया * डेंगू
www.ayurvedamrut.com
सर्व आजारांसाठी परिपूर्ण आयुर्वेदिक उपचार
।। श्री विश्व आयुर्वेदामृत ।।
वैद्य प्रविण पाटील
M.D. (Ayurveda) आयुर्वेद वाचस्पती, पुणे
आयुर्वेदीय पंचकर्म चिकित्सालय व संशोधन केंद्र, पुणे.
For Appointment : 9970266600, 9423252791
अटी लागू.
• पुणे मुख्य शाखा- सोम ते शनि • जळगाव येथे २ऱ्या व ४थ्या रविवारी • मुंबई येथे ३ऱ्या रविवारी
Ayurveda Cure with Care | WATCH संस्थेमार्फत जनहितार्थ